न्यूज एक्सप्रेस मराठी
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | रविवार, दि. 9 जून 2024 | पान- 1

# पावसाळ्यात रस्ते खोदाई केल्यास 'फौजदारी'

## 'परिवर्तन हेल्पलाईन'शी संपर्क करा, समस्या सोडवा : भोसरीत भाजपा आमदार महेश लांडगे यांचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

मान्सूनपूर्व तयारीसह आता पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत विनापरवानगी किंवा पावसाळ्यात बेकायदेशीरपणे रस्ता खोदाई केल्यास संबंधित ठेकेदार कंपनीवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. त्यामुळे ठेकेदार कंपन्या आणि संबंधितांना मनमानीपणे खोदाई करण्याला लगाम बसला आहे.

भोसरी विधानसभा मतदार संघातील भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी मान्सूनपूर्व कामांचा आढावा घेण्यासाठी ऑटो क्लस्टर येथे महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांची बैठक घेतली. त्यावेळी विविध मुद्यांवर चर्चा करण्यात आली.



शहरात विविध ठिकाणी विविध कारणांनी रस्त्यांची खोदाई केली जाते. पावसाळ्यात अशी खोदाई सुरू ठेवल्यामुळे खड्डे पडणे, पाणी साचणे, वाहतुकीला अडथळा निर्माण होणे आणि वाहतूक कोंडी होणे. यासह अपघाताच्या घटनांमध्येही वाढ होते. विशेष म्हणजे, काही ठेकेदार कंपन्या किंवा खासगी जागामालक महापालिकेची परवानगी न घेता खोदाई करतात. त्याचा त्रास सर्वसामान्य नागरिक, प्रवाशांना होतो. त्यामुळे पावसाळ्यात खोदाई पूर्णत: बंद करावी, अशी सूचना आमदार महेश लांडगे यांनी प्रशासनाला केली होती.

> शहरात रस्त्यांची दुरुस्ती आणि डांबरीकरणाची कामे पावसाळ्यापूर्वीच पूर्ण करण्याची आवश्यकता आहे. रस्ते खोदाईमुळे सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे रस्ते खोदाईला परवागनी देवू नये, अशी सूचना केली आहे. महापालिका प्रशासनाने दि. १५ मेपर्यंत खोदाईची कामे पूर्ण करण्याची आदेश दिले होते. त्यानंतर खोदाईवर बंदी घातली आहे. त्यामुळे भोसरी विधानसभा मतदार संघात खोदाईमुळे कुठे असुविधा होत असेल, तर नागरिकांनी 'परिवर्तन हेल्पलाईन- 93 79 90 90 90' शी संपर्क करावा.
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

शहरात विविध सेवा वाहिन्यांच्या कामासाठी वारंवार केले जाणारे खोदकाम आणि त्यानंतर केल्या जाणाऱ्या दुय्यम दर्जाच्या रस्ते दुरुस्तीमुळे शहरातून वाहने चालविणे अवघड होते. त्यामुळे लहान-मोठे अपघात होतात. ते टाळण्यासाठी शहरातील मुख्य रस्ते आणि अतिवर्दळीच्या रस्त्यांवरील जलवाहिन्या, जलनिस:रण वाहिका, पावसाळी गटारे, इंटरनेट आणि अन्य केबल, एमएनजीएल तसेच, वीज वाहिन्यांची कामे पावसाळा सुरू होण्यापूर्वीच करावीत, असे आदेश दिले होते. तसेच, दि. १५ मेपासून खोदकामास परवानेही बंद केले आहेत, असे प्रशासनाने म्हटले आहे.

---

# प्राधिकरणात उलगडणार वाईल्ड लाईफ दुनियेतील 'भावविश्व'

## सुप्रसिद्ध छायाचित्रकार बैजू पाटील यांच्या फोटोग्राफीचा स्लाईड शो आणि प्रकट मुलाखत

**पिंपरी | प्रतिनिधी**

सुप्रसिद्ध छायाचित्रकार बैजू पाटील यांनी जंगलातील थरारक प्रसंग, प्राणी पक्षी यांच्या विविध हालचाली, वाघ, सिंह, हत्ती पासून जगभरातील विविध वाईल्ड लाईफ सेंचुरी व भारतासाह अनेक देश विदेशात टिपलेल्या प्राणी व पक्षी यांच्या अप्रतिम फोटोग्राफीचा स्लाईड शो व त्यांची प्रकट मुलाखत असा अनोखा कार्यक्रम उद्या रविवारी ग. दि. ९ जून रोजी सकाळी ९.३० वाजता माडगूळकर नाट्यगृह निगडी प्राधिकरण येथे पाहता येणार आहे.



वाईल्ड लाईफ फोटोग्राफी स्लाईड शो व त्याच फोटोग्राफर कडून अनुभव कथन असा कार्यक्रम पिंपरी चिंचवड मध्ये प्रथमच होतं आहे. महामेट्रो पुणे व नागपूरचे महाव्यवस्थापक व पिंपरी चिंचवडचे माजी आयुक्त श्रावण हर्डीकर तसेच माजी विभागीय आयुक्त दिलीप बंड, इनोव्हेटिव्ह वल्ड स्कूलचे संचालक डॉक्टर संजय सिंग आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

वाईल्ड लाईफ फोटोग्राफीची क्रेझ जगभरात आहे. यातूनच निसर्ग आपण खूप जवळून समजून घेऊन शकतो या भावनेने देवदत्त फोटोग्राफी स्कूल चिंचवड यांनी हा कार्यक्रम जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित केला आहे. सुप्रसिद्ध वाईल्ड लाईफ फोटोग्राफर पाटील दोन दशकापेक्षा जास्त काळ वाईल्ड फोटोग्राफी या प्रकारात काम करत असून त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार आजवर मिळाले आहेत. नुकताच त्याना फ्रांस मध्येही पुरस्कार प्राप्त झाला असून देश विदेशात त्यांची अनेक वर्कशॉप पण आयोजित होतं असतात.

वाईल्ड लाईफ फोटोग्राफी बद्दल अनेक समज गैरसमज, त्यातील आव्हाने, कोणते कॅमेरे वापरावे, कोणत्या लेन्स वापराव्यात, कोणत्या वेळी कुठे वक्षकशी वाईल्ड लाईफ फोटोग्राफी करावी. या व अशा अनेक प्रश्नांची उत्तर या कार्यक्रमात मिळणार असून बैजू पाटील यांची मुलाखत सुप्रसिद्ध छायाचित्रकार देवदत्त कशाळीकर घेणार आहेत. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या प्रमाणे बैठक व्यवस्था असून कार्यक्रमास कोणतेही प्रवेश शुल्क आकारले जाणार नाही.

# ‘वेळ पाळा अन्यथा थेट कारवाई’ : आयुक्त डॉ. भोसले

## विभागप्रमुखच वेळेचे पालन करत नसल्याने कर्मचारीही वेळ पाळत नसल्याचे समोर

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर पालिका कर्मचाऱ्यांनाही पाच दिवसांचा आठवडा लागू केला आहे. त्यासाठी पालिकेकडून रोजच्या कामाच्या तासात वाढ करून शनिवारी कर्मचाऱ्यांना सुट्टी दिली आहे. मात्र त्यानंतरही विभागप्रमुखच वेळेचे पालन करत नसल्याने कर्मचारीही वेळ पाळत नसल्याचे दिसून आले आहे. त्याची दखल घेत आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी एक फतवा काढून वेळ पाळा अन्यथा थेट कारवाईचा बडगा उगारला जाईल, असा दम दिला आहे.




पालिकेच्या कर्मचाऱ्यांसाठी आता आठवडा चार दिवसांचा झाला आहे. अनेक अधिकारी, कर्मचारी शुक्रवारपासून गायब असतात. त्यामुळे नागरिकांनी कामे होत नाहीत. कामे होत नसल्याने नागरिकांना महापालिकेत हेलपाटे मारावे लागत आहेत. कामाची वेळ सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ अशी आहे. मात्र कर्मचारी, अधिकारी वेळ पाळत नसल्याचे स्पष्ट झाले आहे. सायंकाळी साडेपाच वाजताच कार्यालय सोडून इतर विभागात गप्पा मारत बसतात. तसेच दुपारी जेवणाची वेळ २ ते अडीच अशी असताना अनेकजण दीड वाजता टोळक्याने जेवणासाठी हॉटेल गाठतात. त्यामुळे कर्मचारी २ वाजण्याच्या आधीच दरवाजे बंद करतात. त्यानंतर प्रत्यक्षात ३ वाजता कामकाजाला सुरुवात होते. काही अधिकारी साडेतीननंतर कार्यालयात येऊन पुन्हा साडेपाच वाजता कार्यालय सोडतात. यामुळे नागरिक थेट आयुक्तांकडे तक्रार घेऊन जातात. त्यानंतर आयुक्तांनी कारवाईचा इशारा दिला आहे.

### भेटण्याच्या वेळेचे फलक लावा..

आयुक्तांकडून सोमवार, गुरुवारी नागरिकांना भेटण्यासाठी वेळ दिली आहे. नागरिक या दिवशी तक्रारी घेऊन येतात. परंतु विभागप्रमुख जागेवर नसल्याने कामे होत नाहीत. त्यामुळे नागरिक आयुक्तांकडे दाद मागत आहेत. याची गंभीर दखल घेत आयुक्तांनी विभागप्रमुखांनीही नागरिकांना भेटण्यासाठी वेळा निश्चित करून त्याचा फलक लावण्याच्या सूचना दिल्या आहेत.

### अधिकारी फिरकलेच नाहीत

बांधकाम विभागात वैयक्तिक कामासाठी आलो होता. विभाग प्रमुखांनी झोन ४ चे उपअभियंता यांना भेटण्यास सांगितले होते. त्यानुसार गेलो असता अधिकारी उपस्थित नव्हते. विचारणा केली असता, बाहेर असतील असे उत्तर दिले. दोन तास वाट पाहिली, पण ते आले नाहीत. दुसऱ्या दिवशी पुन्हा ४ वाजता आलो. पण त्यानंतरही ते भेटलेच नाहीत. त्यांचा शोध घेतल्यानंतर ते कार्यकारी अभियंत्यांच्या कार्यालयात दिसले. त्यांना विचारले असता, मी माझ्या केबिनमध्ये येतो, मग आपण बोलू असे सांगितले. पण ते काही आले नाहीत, असा अनुभव एका नागरिकाने सांगितला.

### हजेरी मशिन बंद

» कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीची नोंद ठेवण्यासाठी मुख्य इमारतीत हजेरी मशिन बसविले आहे. यावर कर्मचाऱ्यांना कामगार क्रमांक आणि हाताचा अंगठा देऊन हजेरी लावता येते. मात्र, ही यंत्रणाच बंद असून, यातील बहुतांश मशिनची वीज जोडणी काढून ठेवली आहे. त्यामुळे उशिरा येणाऱ्या अधिकाऱ्यांचे चांगले फावते. आपल्या सोयीच्या वेळी येऊन रजिस्टरमध्ये नोंदणी करताना चुकीची महिती भरली जाते.

# पुणे विमानतळावरील सेवेला फटका!

## पक्ष्यांनी रोखला विमानांचा मार्ग : उड्डाणास विलंबामुळे प्रवाशांचे हाल

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे विमातळावर शुक्रवारी सकाळी विमानांचा मार्ग काही काळ पक्ष्यांनी रोखून धरला. यामुळे विमानसेवेला फटका बसला. पुण्याकडे येणारी काही विमाने दुसरीकडे वळविण्यात आली, तर काही विमानांच्या उड्डाणाला विलंब झाला.



पुणे विमानतळावर सकाळी मोठ्या संख्येने पक्ष्यांच्या घिरट्या सुरू होत्या. त्यामुळे हवाई वाहतूक नियंत्रण (एटीसी) कक्षाला धावपट्टी काही काळ तात्पुरती बंद करावी लागली. यामुळे पुण्याहून दिल्लीला जाणाऱ्या इंडिगोच्या विमानाचे उड्डाण विलंबाने झाले. हे विमान सकाळी ११.१५ वाजता उड्डाण करणार होते; परंतु, प्रत्यक्षात त्याचे उड्डाण दुपारी १२.३० वाजता झाले. याबाबत प्रवाशांनी समाजमाध्यमावर तक्रारी केल्या आहेत. विस्ताराचे दिल्ली ते पुणे हे विमान मुंबईलावळविण्यात आले. हे विमान मुंबईत सकाळी ११.३० वाजता पोहोचले. त्यानंतर हे विमान मुंबईहून दुपारी १.१० वाजता रवाना होऊन पुण्यात १.३० वाजता पोहोचले.

एअर इंडियाचे मुंबई ते पुणे हे विमान पुणे विमानतळाच्या हवाई हद्दीत आले होते. त्याला विमानळावर उतरण्यास नियंत्रण कक्षाने परवानगी नाकारली. हे विमान सकाळी १०.५० वाजता पुणे विमानतळावर उतरणे नियोजित होते. नियंत्रण कक्षाने परवानगी नाकारल्याने हे विमान हवेत घिरट्या घालत राहिले. अखेर हे विमान पुन्हा मुंबई विमानतळावर पाठविण्यात आले. याबाबत रोहित मोटवानी या प्रवाशाने समाजमाध्यमावर आपला अनुभव मांडला आहे. त्याने म्हटले आहे, की मी आज एअर इंडियाच्या मुंबई ते पुणे विमानाने प्रवास करीत होतो. पुणे विमानतळावर हेविमान सुमारे तासभर घिरट्या घालत होते. विमानतळावर घिरट्या घालणाऱ्या पक्ष्यांची संख्या जास्त असल्याने विमान उतरविणे शक्य नसल्याची माहिती वैमानिकाने प्रवाशांना दिली. त्यानंतर हे विमान पुन्हा मुंबईकडे रवाना झाले.

### पक्ष्यांमुळे दुर्घटनेचा धोका

» पक्ष्याची धडक विमानाला बसण्याच्या घटनांची नोंद केवळ भारतात नव्हे, तर जगभरात मोठ्या प्रमाणात होते. विमान सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून ही अतिशय गंभीर बाब आहे. पक्ष्याची धडक विमानाला बसून अनेक दुर्घटना घडल्या असून, त्यात अनेक जणांना जीव गमवावा लागला आहे. पक्ष्याची धडक बसल्याने अपघात घडण्याचा धोका असला, तरी मोठी दुर्घटना घडण्याचे प्रमाण कमी आहे. अनेक वेळा विमानाचे नुकसान होते अथवा तांत्रिक बिघाड निर्माण झाल्याने विमान विमानतळावर उतरवावे लागते.

# नवीन तहसील कार्यालयाचा प्रस्ताव प्रलंबित

## 20 गुंठे जागेच्या मागणीचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आला वर्ष उलटूनही तोडगा निघाला नाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

टपालाची वाढती संख्या... अपुरे कर्मचारी...कार्यालयाची अडगळीची जागा, अशा अवस्थेत सुरू असलेल्या निगडीतील अप्पर तहसील कार्यालयासाठी चिखली येथे नवीन सुसज्ज कार्यालय करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्राजवळील २० गुंठे जागेची मागणीचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आला आहे. मात्र, वर्ष उलटूनही या प्रस्तावावर सकारात्मक तोडगा निघाला नाही. अद्याप हा प्रस्ताव धूळखात पडून आहे. या प्रस्तावाला गती मिळाल्यास तलाठी कार्यालयासह सुसज्ज तहसील कार्यालयाची निर्मिती होणार आहे.

सध्या निगडी येथील 'फ' क्षेत्रीय कार्यालयाच्या शेजारी पिंपरी-चिंचवड अप्पर तहसील कार्यालयाचे कामकाज सुरू आहे. उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला आदींसह विविध दाखले काढण्यासाठी नागरिकांची येथे मोठी गर्दी होत असते. महाविद्यालयीन प्रवेशावेळी आवश्यक रहिवासी आणि उत्पन्नाच्या दाखल्यांसाठी दिवसाकाठी ७०० इतकी मागणी नोंदविली जात आहे. मात्र, दाखले वाटप करताना अनेक अडचणींचा सामना कार्यालयाला करावा लागत आहे.




> चिखली येथे तहसिल कार्यालयाची नवीन इमारत उभी करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठविला आहे. सध्याची जागा अपुरी पडत आहे. सुसज्ज कार्यालयासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करणार आहे.
> - जयराज देशमुख, अप्पर तहसीलदार, पिंपरी-चिंचवड तहसील कार्यालय

### अपुरे कर्मचारी, कामे संथगतीने

या कार्यालयातील अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे दाखले वाटप संथ गतीने चालू आहे. कार्यालयात सध्या आठ लिपिक आहेत. एक अव्वल कारकून, नायब तहसीलदार आणि अप्पर तहसीलदार एवढ्यावर कार्यालयाच्या कामकाजाचा भार आहे. सध्या या ठिकाणची जागा अपुरी पडत आहे.

### दस्तऐवज अजूनही हवेली कार्यालयात !

» पूर्वी हवेली तहसिल कार्यालया अंतर्गत पिंपरी-चिंचवड शहराचा समावेश होता. कालांतराने शहराची लोकसंख्येत मोठी वाढ झाली. सध्या २७ लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या आहे. त्याचा विचार करून निगडी येथे स्वतंत्र अप्पर तहसिल कार्यालय सुरू करण्यात आले. मात्र, २०१३ पर्यंतचे शहरातील दस्तऐवज अद्याप हवेली तहसिल कार्यालयात पडून आहेत. ते घेऊन जाण्याबाबत वारंवार सूचना केल्या जात आहेत. मात्र, निगडी येथील कार्यालयाकडे अपुरी जागा असल्याने ते दस्तऐवज अद्याप आणले नसल्याची माहिती तहसिल कार्यालयाने दिली.

### चिखलीतील जागेची मागणी

» सध्या चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्राजवळील २० गुंठे जागेची मागणी करण्यात आली आहे. पुणे जिल्हाधिकाऱ्यांना त्याबाबतचा प्रस्ताव पाठविला आहे. त्यानुसार, एकदा बैठक घेऊन शासन स्तरावर कार्यवाही काढण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी देखील सकारात्मकता दर्शवली होती. मात्र, पुढे कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

### दस्तावेज, साहित्यासाठी जागेचा अभाव

अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना बसण्यासाठी सुसज्ज व्यवस्था नाही. कार्यालयातील दस्तऐवज, साहित्य ठेवायला जागा नाही. त्यामुळे, नवीन सुसज्ज कार्यालय होण्यासाठी वारंवार पत्रव्यवहार करण्यात आले आहेत. मात्र, त्याला अजून गती मिळालेली नाही.

### आचारसंहितेत प्रक्रिया रखडली

लोकसभा निवडणुका नुकत्याच पार पडल्या. त्याची आचारसंहिता लागू असल्यामुळे नवीन कार्यालयाच्या प्रस्तावावर चर्चा होऊ शकली नाही. परंतु, आता आचारसंहिता संपली असून त्याचा पाठपुरावा करण्यास गती मिळू शकेल, असा विश्वास अधिकारी व्यक्त करत आहेत.

# सोमाटणे, वरसोली टोलनाक्यावर स्थानिक वाहनांना सूट

## नोंदणी केल्यानंतर एमएच-14 पासिंगच्या पांढऱ्या नंबरप्लेटच्या खासगी वाहनधारकांना सूट

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील स्थानिक खासगी वाहनधारकांनी आपल्या वाहनाचे आरसी बुक आणि आधारकार्डची प्रत आयआरबी कार्यालयात जाऊन नोंदणी केल्यानंतर एमएच-१४ पासिंगच्या पांढऱ्या नंबरप्लेटच्या खासगी वाहनधारकांना पुणे - मुंबई महामार्ग (एनएच-४) वरील सोमाटणे आणि वरसोली टोलनाक्यावर पथकरातून आता सूट दिली जाणार आहे.

तळेगाव दाभाडे शहरासह मावळातील स्थानिक वाहन धारकांच्या फास्ट स्टॅगमधून सोमाटणे टोलनाक्यावर परस्पर पथकर वजा होत असल्याच्या वाढत्या तक्रारी लक्षात घेऊन आमदार सुनील शेळके यांनी येत्या १० तारखेला सोमाटणे टोलनाक्यावरील पथकर वसूली बंद पाडण्याचा इशारा दिला होता. या पार्श्वभूमीवर आयआरबीचे मुख्य पथकर अधिकारी नीलेश म्हेत्रे आणि सोमाटणे टोलनाक्याचे व्यवस्थापक महादेव तुपारे यांनी शनिवारी (ता.८) आमदार सुनील शेळके यांच्याशी भेट घेऊन सविस्तर चर्चा करत याबाबत धोरण जाहीर केले. त्याबाबत शेळके आणि अधिकाऱ्यांनी पत्रकारांना माहिती दिली.



> मावळ तालुक्यातील स्थानिक खासगी वाहनचालकांनी ३० जूनपर्यंत आयआरबीच्या सोमाटणे टोलनाक्यावरील कार्यालयात आपली नोंद करून टोल सवलतीचा लाभ घ्यावा. देहूरोड ते लोणावळा दरम्यानच्या मावळ तालुक्यातील स्थानिक वाहनधारकांना टोलमधून सूट देण्यासाठी आपण सदा प्रयत्नशील राहू.
> - आमदार सुनील शेळके

### आपत्ती निवारणाच्या दृष्टीकोनातून आढावा

» दोन दिवसांपूर्वी झालेल्या जोरदार पावसाने भोसरी परिसरातील इंद्रायणीनगर, बालाजीनगर झोपडपट्टी, चक्रपाणी वसाहत, आदीनाथ नगर आदी भागात राहणा-या नागरिकांच्या घरात पावसाचे पाणी घुसले. रात्रभर नागरिकांना घरातील पाणी बाहेर काढावे लागल्याने त्यांची तारांबळ झाली. त्यामुळे नागरिकांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेवर नाराजी व्यक्त केली आहे. त्याची आयुक्त शेखर सिंह यांनी दखल घेतली असून आपत्ती निवारणाच्या दृष्टीकोनातून आढावा घेण्यास त्यांनी सुरुवात केली आहे.

> यापूर्वी फास्ट स्टॅगमधून ज्या स्थानिकांचे पैसे कट झालेत. त्यांचे पैसे फास्ट स्टॅग खात्यावर परत जमा होतील. अथवा फास्ट स्टॅगमध्ये स्थानिक पर्याय कार्यान्वित केल्यास केवळ १० रुपये वजा होऊ शकतील. स्थानिक असल्याच्या पुराव्याची नोंद केल्यानंतर तेही परत जमा होतील. याशिवाय पिवळ्या नंबर प्लेटच्या हलक्या, जड आणि अवजड दर्जाच्या स्थानिक वाणिज्यिक वाहनांसाठी ५० टक्के सूट मासिक पासवर उपलब्ध आहे.
> - नीलेश म्हेत्रे, मुख्य पथकर अधिकारी, आयआरबी.

# पवारांचे लक्ष्य छत्रपती कारखाना

## श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत पक्षाचा पॅनल उभा करणार : सुप्रिया सुळे

**पुणे | प्रतिनिधी**

भवानीनगर (ता. इंदापूर) येथील छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या सत्तेच्या चावी वर्षानुवर्षे या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हाती आहेत. मात्र, लोकसभा निवडणूक जिंकल्यानंतर खासदार सुप्रिया सुळे या पहिल्यांदा गुरुवारी (दि. 6) रात्री इंदापुरात पोहोचल्या आणि छत्रपती सहकारी साखर कारखाना पूर्ण ताकतीने लढवायचा आहे आणि जिंकायचा आहे,

अशी घोषणा करून खळबळ उडवून दिली आहे. दरम्यान, पवारांच्या करिष्म्याने हा कारखाना जर अजित पवार यांच्या हातून निसटणार का, की अजितदादांचा करिष्मा चालणार हे निवडणुकीत समजेल मात्र तोपर्यंत वेट अँड वॉचच्या भूमिकेतच रहावे लागेल.

अजितदादांची राजकीय ताकद इंदापूर, बारामती नव्हे तर राज्याला चांगली माहिती होती; मात्र या राजकीय ताकतीची हवा लोकसभा निवडणुकीत शरद पवारांनी काढून घेतलेली आहे.

इंदापूर तालुक्यात तर लोकसभेला विळा भोपळ्याचे वैर असलेले आमदार दत्तात्रय भरणे, भाजप नेते हर्षवर्धन पाटील यांनी एकत्र येत अजित पवारांच्या विचाराला साथ देत सुनेत्रा पवारांचा मनापासून प्रचार केला; परंतु हाती भोपळा लागला अशी परिस्थिती निवडणुकीच्या निकालानंतर दिसली.

इंदापूर तालुक्यात पवारांची जादू राजकीय चालते हे लोकसभेच्या निवडणुकीच्या निकालावरून प्रत्येक सामान्य माणसाला कळाले आहे. छत्रपती सहकारी साखर कारखाना हा देखील शरद पवारांच्याच मार्गदर्शनाखाली, उपमुख्यमंत्री अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यात ठेवत होते.

आमदार भरणे यांची प्रचंड साथ अजित पवारांच्या पाठीशी आजपर्यंत आहे. लोकसभेचा निकाल झाल्यापासून गावोगावी राजकीय चित्र वेगळे निर्माण झाले आहे.



### राजकीय गणिते आखली जाणार

» आज पर्यंत या छत्रपती सहकारी साखर कारखान्यावर प्रत्येक पंचवार्षिक निवडणुकीमध्ये विरोधकांनी मोठ्या प्रमाणात ताकद लावून देखील हा श्री छत्रपती सहकारी साखर कारखाना हा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ताब्यात राहिला आहे. मात्र काल झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या निकालावरून इंदापूर तालुक्यातील सर्व राजकीय चित्र बदलले असून इंदापूर तालुक्यातील प्रत्येक निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाच्या माध्यमातून राजकीय गणिते आखली जाणार असून पूर्ण ताकदीनिशी प्रत्येक निवडणुकीत यशस्वी होण्यासाठी सर्व समाजाला एकत्र करून निवडणूक लढविले जाणार असल्याने येणारी श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याची निवडणूक एकतर्फी होणार नसून या निवडणुकीसाठी दोन्ही पॅनल मध्ये खऱ्या अर्थाने चुरस निर्माण होणार असल्याचे चित्र सध्यातरी दिसत आहे.

### कारखान्याची निवडणूक ऐतिहासिक ठरणार

» बारामती लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाच्या माध्यमातून खासदार सुप्रिया सुळे यांचा प्रचार इंदापूर तालुका मध्ये सुरू असतानाच शरयू फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ शर्मिला पवार यांच्या उपस्थितीमध्ये श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्ष हा पॅनल तयार करण्याचे जाहीर करण्यात आले होते. त्यामुळे त्या वेळपासूनच श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील राजकीय वातावरणामध्ये बदल झालेला असून येणाऱ्या काळामध्ये श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याची निवडणूक ही नक्कीच ऐतिहासिक निवडणूक ठरणार आहे.

### वेगळा इतिहास लिहला जाणार?

» छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीच्या याद्या जाहीर झाले आहेत. आता काही दिवसांवर येथील निवडणूक आलेली आहे. त्यामुळे या साखर कारखान्याच्या इतिहासात आणखी वेगळा इतिहास या निवडणुकीच्या रूपाने जनतेला, सभासदांना पाहण्यास मिळणार आहे.

# दुष्काळातही लालबुंद टोमॅटोने केले लखपती

## 10 रुपये प्रति किलोने 70 टन विक्री : अजून 08 ते 10 लाखांचे उत्पन्न अपेक्षित

**पुणे | प्रतिनिधी**

सरकारची निर्यातबंदी सारखी धोरणे व निसर्गाचा लहरीपणा शेतकऱ्यांच्या मुळावर उठला आहे. तरीही बळीराजा खचलेला नाही. त्यातच या वर्षी पुरंदर तालुक्यात तीव्र दुष्काळी परिस्थिती, मध्येच उन्हाच्या झळा तीव्र असताना श्रीक्षेत्र वीर (ता.पुरंदर) येथील प्रताप विलास धुमाळ यांची लालबुंद टॉमेटोने शेती बहरली आहे. सध्या त्यांना 10 रुपये प्रति किलोने दर मिळत असून आत्तापर्यंत 7 लाखांचे उत्पन्न मिळाले आहे, अजून 8 ते 10 लाख रुपये उत्पन्न मिळणार असल्याचे प्रताप धुमाळ यांनी सांगितले आहे.

धुमाळ यांनी पीक पद्धतीत सातत्य ठेवले आहे. ते दर वर्षी उन्हाळ्यात टॉमेटोचे पीक घेत आहेत. प्रताप धुमाळ यांनी यंदा दोन एकर क्षेत्रावर टोमॅटो लागवड केली. लागवडीसाठी अथर्व जातीची निवड केली. टोमॅटो लागवड करण्यापूर्वी त्यांनी जमिनीची मशागत करून यामध्ये बेड तयार करून घेतले नत्र स्फुरद पालाश व मायक्रो न्यूट्रन, शेणखताचा वापर करून बेड भरून घेतले ठिबक सिंचन अंथरुन दोन सरीमध्ये साडेचार फुटाचे अंतर ठेवून मल्चिंग पेपर अंथरुन झिकझॅक पद्धतीने 20 हजार रोपांची लागवड केली.

लागवड झाल्यावर ह्युमिक ॲसिड, सिलिका, सीवीड एक्सट्रॅक्ट, किटकनाशके व बुरशीनाशकांच्या वेळोवेळी फवारण्या केल्या. रोपांच्या वाढीसाठी वेळोवेळी पाण्यातून विद्राव्य खतांच्या मात्रा दिल्या रस शोषणारी कीड, फूल कीड, पांढरी माशी आदी अळ्या व रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून चिकट व लाइट सापळ्यांचा वापर केला.

1 मे रोजी टॉमेटो पिकाचा पहिला तोडा झाला आत्तापर्यंत चार तोडे झाले असून 70 टन उत्पन्न निघाले आहे. 10 रुपये प्रति किलो प्रमाणे विक्री झाली असून साडेसहा लाख रुपये उत्पन्न मिळाले आहे. टोमॅटो खरेदीसाठी व्यापारी बांधावर येत असून रोख पैसे देऊन खरेदी करतात.

आता बाजारभाव वाढत चालले आहेत अजून 8 ते 10 लाख रुपये उत्पन्न मिळणे अपेक्षित आहे. चार लाख रुपये खर्च वजा जाता 12 लाख रुपये उत्पन्न मिळणार असल्याचे प्रताप धुमाळ यांनी सांगितले आहे. गेल्या वर्षी दिड एकर क्षेत्रावर टोमॅटो शेती केली होती बाजारभाव व वातावरण चांगले असल्याने 20 लाख रुपये उत्पन्न मिळाले होते.



### पारंपरिकमध्ये बदल; हंगामावर जोर

» पारंपरिक पीक पद्धतीत बदल करून हंगामी भाजीपाला पिकांची लागवड आम्ही करत आहोत. यामध्ये टोमॅटो, स्ट्रॉबेरी, काकडी, ढोबळी मिरची, कलिंगड टरबूज आदी पिके घेत असल्याने लाखो रुपयांचे उत्पन्न मिळत आहे.दिलीप धुमाळ व रवींद्र धुमाळ हे दोन मोठे भाऊ मला शेती करताना मार्गदर्शन करत असल्याचे प्रताप धुमाळ यांनी सांगितले.